# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक २३.०९.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २२.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १३ केसेसमध्ये १३ ईसमावर कारवाई करून एकुण २१,६१०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०४ केसेसमध्ये ०७ इसमांवर कारवाई करून एकुण १८,७५५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, दिनांक २२.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २३.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०२ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ५८ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ४१ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १९९ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २५४ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १८ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये १२३ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १७ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ७९ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०२ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २८ केसेस, विटाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये १८ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये २,१६६ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ० केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २० केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण ३,१०५ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ११,३५,५००/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ०५ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपींना अटक, ०२ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १४.०५.२०२६ चे २१.०० वा. ते २१.१५ वा. चे दरम्यान, फिर्यादी प्रफुल्ल दिलीप पेटकर, वय २४ वर्षे, रा. नाका नं. २, कामठी रोड, हलीमा मस्जीद चे बाजुला, अन्सारी टेलर्स जवळ, यशोधरानगर, नागपूर हे त्यांची सुझुकी मोपेड क्र. एम.एच ४९ सि.जी ६२४९ किंमती ५५,०००/—रू. ची पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील रिलायन्स जीओ मार्ट समोर सिएमपिडीआय रोड, जरीपटका, नागपूर येथे लॉक करून, पार्क करून रिलायन्स जीओ मार्ट मध्ये ग्राहकांकडुन स्विकारलेले पैसे जमा करण्यासाठी गेले असता, कोणीतरी अज्ञात

चोरट्याने फिर्यादीची नमुद मोपेड वाहन चोरून नेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०५ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपी १) धनंजय गुरूदयाल जगने, वय १९ वर्षे, रा. ग्राम धोबीसराह, तह. कुरई, जि. शिवनी (मध्यप्रदेश), २) राकेश रामसिंग चौधरी, वय २७ वर्षे, रा. ग्राम धुंडासिवनी, पोस्ट दरासिकला, पो.ठाणे कुरई, जि. शिवनी (मध्यप्रदेश) यांना ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा त्यांचा साथीदार पाहीजे आरोपी ३) प्रजीत राजकुमार बिसेन, वय २४ वर्षे, रा. तुरीयापार, तह. कुरई, जि. शिवनी (मध्यप्रदेश) याचेसह संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपींना अधिक सखोल विचारपूस केली असता, त्यांनी या गुन्हयाव्यतीरिक्त पोलीस ठाणे शिवनी (मध्यप्रदेश) हद्यीतून पॅशन प्रो दुचाकी क्र. एम.पि २२ एम.एफ ७४०६ चोरी केल्याचे सांगीतले. आरोपींकडुन एकुण ०२ वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. आरोपींना गुन्हयात अटक करून, त्यांचे ताब्यातुन चोरी केलेले नमुद ०२ वाहनांव्यतीरिक्त ३) माईस्ट्रो एज मोपेड क्र. एम.एच ४० ए.डब्ल्यु १९७५, ४) पॅशन प्रो दुचाकी क्र. एम.पि २२ एम.टी १८२६, ५) बजाज पल्सर दुचाकी क्र. एम.एच ३१ बि.एक्स ९९९४, ६) स्प्लेंडर दुचाकी क्र. एम.पि २० एम.सि ३२८७ असे एकुण ०६ दुचाकी वाहने किंमती अंदाजे २,९०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईकामी जरीपटका पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. जप्त ईतर ०४ वाहनांबाबत तपास व पाहीजे आरोपीचा शोध सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, पोउपनि. विशाल सांगोळे, पोहवा. शेख नजीर, राजु टाकळकर, राजेंद्र टाकळीकर, प्रविण भगत, अनिस खान, राजुसिंग राठोड, योगेश महाजन, गणेश ठाकरे, पोअं. विशाल नागभिडे, दिपक बावणकर, निलेश गायकवाड, रोशन तांदुळकर, लिलाधर खिरडकर व आशिष पवार यांनी केली.




**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. १ पथकाची कामगीरी :— चोरी व वाहनचोरी चे एकुण ०४ गुन्हे उघडकीस. ६,४०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त.</u>**

दिनांक २४.०६.२०२६ चे २०.०० वा. ते ३१.०८.२०२६ चे ०९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे अजनी हद्यीतील विलास नगर, जुना बाबुळखेडा, येथे राहणारे फिर्यादी महादेव कारकुजी खोडे, वय ६५ वर्षे यांची पत्नी बाहेरगावी गेलेल्या होत्या व ते घरी दररोज मुख्यदार उघडे ठेवुन झोपत होते. दरम्यान कोणीतरी

अज्ञात चोरट्याने, फिर्यादीचे घराचे उघड्या दारातुन प्रवेश करुन, बेडरूममधील आलमारीतील सोन्याचे वेगवेगळे दागिने वजनी २३ ग्राम एकुण किंमती १,३५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरुन नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीविरुध्द पोलीस ठाणे अजनी येथे कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. १ पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन व मिळालेल्या गुप्त बातमीवरुन, आरोपींना निष्पन्न करुन, आरोपी नामे १) पियुष रविंद्र जगनाडे, वय २२ वर्षे, रा. टेकेपार माडगे, जि. भंडारा, ह.मु.— शताब्दी चौक, अजनी २) श्रीकांत धनिराम चांदेवार, वय २१ वर्षे, रा. निलागोंदी, तह. लाखनी, जि. भंडारा यांना ताब्यात घेतले. आरोपींना गुन्हेसंबंधाने विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे कबुल केले. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे अजनी हद्दीत १ वाहनचोरी तसेच, पो. ठाणे हिंगणा व मौदा नागपुर ग्रामीण हद्दीत प्रत्येकी ०१ वाहनचोरी तसेच, पो. ठाणे सिताबर्डी हद्दीत ०१ चोरीचा गुन्हा असे एकुण ०४ चोरी व वाहनचोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन सोन्याचे दागिने, ०१ अॅक्टवा मोपेड वाहन, ०१ हिरोहोंडा पॅशन प्रो दुचाकी वाहन व ०१ पल्सर मोटारसायकल वाहन आणि ०२ मोबाईल फोन असा एकुण ६,४०,०००/—रू. असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव अजनी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे मानकापुर :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक २३.०९.२०२६ चे ०३.०० ० वा. चे सुमारास, मानकापुर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, गोधनी रेल्वे, केजीएम नगर, प्लॉट नं. ८५ येथे

राहणारा हद्दपार इसम घरी आलेला आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, एक इसम पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचे प्रयत्नात असतांना, त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव गौरव पुरूषोत्तम बलकी, वय २१ वर्षे असे सांगीतले. आरोपीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०२ यांचे हद्दपार आदेश क्र. २३४०/२०२६ दिनांक ३०.०३.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०६ महीन्यांकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोउपनि. सुनिल डगवाल यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे पोउपनि. उध्दव पोखरकर यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे एमआयडीसी :— शस्त्र बाळगुन धुमाकुळ घालणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २२.०९.२०२६ चे २२.०० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना ईसासनी स्मशान घाट जवळ एक इसम हातात तलवार घेवुन येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना शिवीगाळी करुन, धूमाकूळ घालतांना दिसुन आला. पंचासमक्ष त्यास घेराव टाकुन ताब्यात घेवुन त्यास निशस्त्र केले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अश्वीनी दिनेश मेश्राम, वय ३२ वर्षे, रा. बौध्द नगरी, ईसासनी, एमआयडीसी, नागपूर असे सांगीतले. त्याचे ताब्यातुन एक लोखंडी तलवार किंमती १,०००/—रू. ची जप्त करण्यात आली.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार बाळगुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट नं. ५ अ, शारदा चौक, जुना सुभेदार ले—आऊट येथे राहणारे फिर्यादीचे वडील नामे प्रभाकर मारोतराव उजवणे, ७६ वर्षे हे दिनांक २२.०९.२०२६ चे ०६.०० वा. चे सुमारास, राहते घरून पायी फिरण्यास गेले असता, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत मानेवाडा रोड, वैरागडे हॉस्पीटल समोर कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे वडीलांना धडक देवुन, गंभीर जखमी करुन घटनास्थळावरून पळुन गेला. जखमी यांना उपचारकामी मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी रोहीत प्रभाकर उजवणे, वय ५० वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), १२५(ब), २८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे एमआयडीसी :—** दिनांक २२.०९.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, हिंगणा एमआयडीसी परीसरात एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ६० वर्षे वयाचे, आजारी व बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, वार्ड क्र. ५२ येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान डॉक्टरांनी रात्री २०.०० वा. चे सुमारास त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे एमआयडीसी येथे संपर्क साधावा.

यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे सपोनि. शशिकांत तायडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**